महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे ११.

# नियामक मंडळाची १९ वी बैठक दि.१६.१२.१९९९

मा. ना. अजित पवार, मा. मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळ) व फलोत्पादन आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची १९ वी बैठक दि.१६.१२.१९९९ रोजी नागपूर येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र. १९/१

''ठराव करण्यात येतो की १८ व्या बैठकीमध्ये पारित करण्यात आलेले ठराव क्र.१८/१ ते १८/३, १८/५ ते १८/९ कायम करण्यात येत आहेत.ठराव क्र.१८/४ खालीलप्रमाणे सुधारित करुन कायम करण्यात येत आहे.''

सुधारित ठराव क्र.१८/४

''ठराव करण्यात येतो की, १.आतृमंडळ, पुणे, २)पुणे जिल्हा पाटबंधारे अभियंता, सहकारी पतसंस्था, पुणे, ३)विवेकानंद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे. ४) श्री.छत्रपती सहकारी गृहरचना संस्था (नियोजित) पुणे, ५) संत मुक्ताई संमिश्र सहकारी गृहरचना संस्था, पुणे यांना नियामक मंडळाच्या १८ व्या बैठकीतील ठराव क्र.१८/४ नुसार महामंडळाची जागा भाडेपट्टयाने देण्याच्या निर्णयास स्थगिती देण्यात येत आहे.''

''गुरुकुल'' अभिनव पध्दतीची शाळा चालविणाऱ्या ''सरस्वती एज्युकेशन सोसायटी, पुणे यांना दिलेल्या जमिनीच्या भाडेपट्टयाची मुदत पाच वर्षावरुन ३५ वर्षे करण्यास मान्यता देण्यात येत आहे'' सदर संस्थेकडून वाढीव कालावधीसाठी भाडेपट्टयात वाढ करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

ठराव १९/२

'' ठराव करण्यात येतो की, १) कृष्णा खोऱ्यातील प्रकल्पांच्या सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्या संदर्भात १८ व्या बैठकीतील मंजूर ठराव क्र.१८/३ नुसार इं.श्री.मि.देवकुळे, सल्लागार यांनी दिलेले निष्कर्ष व शिफारशी सर्वसाधारणपणे स्वीकृत करण्यात येत आहेत. तसेच परिशिष्ठ क्र.३ मधील २ मोठे, ६ मध्यम व ५४ लघु प्रकल्पांच्या अंदाजपत्रकांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.''

२) प्रशासकीय मान्यतेच्या खर्चाच्या १० % चे वर खर्च सुधारित प्रशासकीय मान्यता घेतल्याशिवाय करू नये असे महामंडळाचे धोरण आहेच. तथापि कृष्णा पाणी वाटप तंटा लवादाचा निर्णय विचारात घेऊन ज्या प्रकल्पांवर अंदाजपत्रकीय किमतीपेक्षा १०% जास्त खर्च अपेक्षित आहे वा झालेला आहे व ज्या प्रकल्पांची सुधारित अंदाजपत्रके महामंडळ

2-1-2000

| | |
|---|---|
| मा. मंत्री (पा) व अध्यक्ष<br>म.कृ.खो.वि.म., पुणे | कार्यकारी संचालक<br>म.कृ.खो.वि.म. पुणे |

DIR_MEET_19_resolution

स्तरावर सादर झाली आहेत, त्या प्रकल्पांची कामे मे २००० पर्यंत निर्धारित पाणीसाठा निर्माण होण्याचे दृष्टीकोनातून प्रगतिपथावर ठेवण्यासाठी आवश्यक तो खर्च करण्यास नियामक मंडळाची विशेष मान्यता देण्यात येत आहे. ही विशेष मान्यता मे २००० पर्यंतच राहील.

ठराव क्र. १९/३

``ठराव करण्यात येतो की, जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेमध्ये हनुमान सेवा सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित दंडवाडी, या योजनेचा त्याच्या दायित्वासह समावेश खास बाब म्हणून करण्याच्या घेतलेल्या निर्णयास, नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. या कामासाठी होणाऱ्या रु.१.८१ कोटी इतक्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात येत असून, याची तरतूद सदर प्रकल्पाच्या सुधारित अंदाजपत्रकात करण्यात यावी.''

ठराव क्र. १९/४

``ठराव करण्यात येतो की,

अ. कोयना टप्पा ४(ब), जादा सिंचन विमोचक, कोयना धरणाच्या सांडव्यांच्या दरवाजांना झडपा बसविणे इ. कामे करण्यासाठी आवश्यक ते सर्वेक्षण व अन्वेषण करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत असून सर्वेक्षण व अन्वेषणाची निकड लक्षात घेऊन याकामासाठी रु.९६ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ब. सर्वेक्षण व अन्वेषण पूर्ण झाल्यावर कोयना टप्पा ४(ब), जादा सिंचन विमोचक, सांडव्यावरील दरवाज्यांना झडपा बसविणे इ. कामांच्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार मा.अध्यक्षांना देण्यात येत आहेत.''

ठराव क्र.१९/५

``ठराव करण्यात येतो की, दि.०१.०४.१९९६ पूर्वी महामंडळाचे कार्यक्षेत्रांतील कामांवरील रु.२२.९२ कोटी सुरक्षा अनामत रक्कम वसुलीपैकी ज्या कंत्राटदारांची कामे पूर्ण झाली आहेत, त्या कंत्राटदारांच्या अनामत रकमा सद्य:स्थितीत महामंडळाचे निधीमधून अदा करण्यास नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे. तसेच रक्कम

2.1.2000

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

महामंडळाकडे त्वरित अदा करण्याबाबत शासनाकडे आग्रही पाठपुरावा करण्याबाबत मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. १९/६

''ठराव करण्यात येतो की, कृष्णा पाणी वाटप तंटा लवाद निर्णयाचा मे २००० नंतर आढावा घेण्यात येणार असल्याने, भावी लवादासमोर राज्याची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी तसेच लवादा संदर्भातील न्यायालयीन प्रकरणांसाठी महामंडळ स्तरावर मुख्य अभियंता (कृष्णा पाणी वाटप लवाद) असे पद निर्माण करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन सदरचे पद निर्माण करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत असून सदरचे पद प्राथम्याने निर्माण करण्यास शासनास विनंती करण्यात यावी.''

ठराव क्र.१९/७

''ठराव करण्यात येतो की, १५ व्या बैठकीतील ठराव क्र.१५/२ खालीलप्रमाणे सुधारित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

कृष्णा खोऱ्यातील प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील इक्षूमर्यादेच्या आत पाणी वापर होऊनही, जमिनी पाणथळ झाल्या असतील, अशा पाणथळ जमिनी लागवडीयोग्य करण्यासाठीच्या जलनिस्सारण कामांच्या अंदाजपत्रकांना, प्रशासकीय मान्यता/सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार खालीलप्रमाणे असावेत असे ठरले.

१. प्रकल्पाच्या लागवडीयोग्य क्षेत्राच्या ३% मर्यादेपर्यंत संचित क्षेत्र असलेल्या जलनिस्सारण योजनांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार क्षेत्रीय मुख्य अभियंता यांना देण्यात यते आहेत.

२. प्रकल्पाच्या लागवडीयोग्य क्षेत्राच्या ३% पेक्षा जास्त संचित क्षेत्र असलेल्या जलनिस्सारण योजनांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता/सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.

३. शासन परिपत्रक क्र.सीडीए१०९९/(४९/९९)/लाक्षेवि(कामे) दि.०३.०७.१९९९ मधील सूचना विचारात घेऊन जलनिस्सारणाची कामे 'ठेव कामे' म्हणून पाटबंधारे संचालनालयाकडून करुन घेण्यासाठी, मे २००० पर्यंत महामंडळाच्या प्रकल्पांच्या बांधकामांचे एकूणच प्राधान्य लक्षात घेता, आवश्यक तो निधी मे २००० नंतर पाटबंधारे संचालनालयास उपलब्ध करुन देण्याचे अधिकार मा.अध्यक्षांच्या संमतीने कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.''

3.1.2000

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे
DIR MEET 19 resolution

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे ११.

ठराव क्र.१९/८

''ठराव करण्यात येतो की, कृष्णा खोऱ्यातील खालील नमूद केलेल्या ९ धरणांच्या संचय क्षमतेमध्ये पूर संरक्षणाच्या योजनेअंतर्गत वाढ करण्यास व तद्नुषंगाने आवश्यक तो खर्च करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत असून धरणांच्या सांडव्याच्या दरवाज्यांना झडपा बसविण्याचे काम मे २००० पूर्वी यांत्रिकी संघटनेमार्फत त्वरेने पूर्ण करावे.

अ. धरणांच्या सांडव्याच्या दरवाज्यांना झडपा बसविणे

१.उजनी २.वारणा ३.दूधगंगा ४.डिंभे ५.कण्हेर ६.पानशते ७.कोयना

ब. बांधकामाधीन धरणांच्या संकल्पनात बदल करणे

१.टेमघर २.पिंपळगाव जोगे

ठराव क्र. १९/९

''ठराव करण्यात येतो की, शासन पत्र क्र. धसुंस१०९९ /(१४/९९)/ सिंव्य (कामे) दि.१८.०८.१९९९ मधील सूचना विचारात घेऊन, महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील खाली नमूद केलेले प्रकल्प जागतिक बँकेच्या मदतीने घ्यावयाच्या, धरण सुरक्षितता टप्पा-२ प्रकल्पांतर्गत, दुरुस्ती व मजबुतीकरणाच्या कामांसाठी घेण्यास मान्यता देण्यात येत असून, त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनास विनंती करण्यात यावी.''

| अ.क्र. | धरणाचे नाव | जागतिक बँकेकडून सहाय्य म्हणून घेण्याची अंदाजित रक्कम (रु.कोटी) |
|---|---|---|
| १. | येडगाव धरण | १४.१८ |
| २. | माणिकडोह | २.९८ |
| ३. | डिंभे | २.९८ |
| ४. | वडज | ३.५३ |
| ५. | धोम | १.२८ |
| ६. | कण्हेर | १.७३ |
| ७. | उजनी | २.८८ |
| ८. | वारणा | ३.०७ |

३.१.२०००

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे
DIR MEET 19 resolution

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

| अ.क्र. | धरणाचे नाव | जागतिक बँकेकडून सहाय्य म्हणून घेण्याची अंदाजित रक्कम (रु.कोटी) |
|---|---|---|
| ९. | दूधगंगा | २.५१ |
| १०. | शिखलवाडी लपा | ०.१८ |
| | एकूण : | ३५.३२ |
| १. | वरसगाव धरण | ९.९१ |
| २. | पवना धरण | १३.६० |
| ३. | मारोबा तलाव | ०.२९ |
| ४. | म्हसवड (मप्र) | ४.८६ |
| ५. | भुतवडा (लपा) | ०.२० |
| | एकूण : | २८.८६ |
| एकूण एकंदर (अ + ब) : | | ६४.१८ |

**ठराव क्र.१९/१०**

**''ठराव करण्यात येतो की, सन १९९८-९९ या आर्थिक वर्षाच्या रु.७३५६.०८ कोटींच्या ताळेबंदास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''**

**ठराव क्र. १९/११**

''ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र भूविकास महामंडळाकडील श्री. चिपरे, शिपाई म.कृ.खो.वि.म. कडे प्रतिनियुक्तीवर आहेत. ह्या कर्मचाऱ्यास नियामक मंडळाच्या मंजूर ठराव क्र.१६/१८ मधील सेवाशर्तीतील अट क्र.९ - *वैद्यकीय अनुदान प्रतिवर्षी रु.५०० म.कृ.खो.वि.म. मार्फत अदा करण्यात येतील.* ही अट वर्ष १९९९ पुरती रद्द करण्यात येत असून सदर कर्मचाऱ्यास वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी रु. ३८६०/- मंजूर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

३.१.२०००

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

DIR MEET 19 resolution

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे ११.

ठराव क्र. १९/१२

``ठराव करण्यात येतो की,

प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ मध्ये विहित केलेल्या १३ नागरी सुविधा व्यतिरिक्त ज्या नागरी सुविधा अत्यावश्यक असतील व प्रकल्पग्रस्तामार्फत तशी मागणी वारंवार होत असेल तर, अशा नागरी सुविधांची आवश्यकता पडताळून पाहून त्यांना मान्यता देण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. यांना देण्यात येते आहेत.``

3.1.2000

| | |
|---|---|
| मा. मंत्री (पा) व अध्यक्ष<br>म.कृ.खो.वि.म., पुणे | कार्यकारी संचालक<br>म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

परिशिष्ट-३

## सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी शिफारस केलेले प्रकल्प

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | मूळ प्रशासकीय मान्यता किंमत रूपये लक्ष | सुधारित प्रशासकीय मान्यतेची किंमत रूपये लक्ष |
|---|---|---|---|
| अ | **मोठे प्रकल्प** | | |
| | **जि.पुणे** | | |
| १ | निरा डावा कालवा नूतनीकरण | १४३८,४३ | ४६५६,९ |
| २ | जनाई शिरसाई उपसा सिंचन योजना | ५६९२,६ | १४४२४,४३४ |
| ब | **मध्यम प्रकल्प** | | |
| | **जि.कोल्हापूर** | | |
| १ | पाटगाव मध्यम प्रकल्प ता.भुदरगड | ५३९,६५ | ८२२०,३९ |
| २ | कासारी मध्यम प्रकल्प ता. शाहूवाडी | ६१५,१८ | २८८०,० |
| ३ | कडवी मध्यम प्रकल्प ता. शाहूवाडी | ३४७,३ | ६९७३,७ |
| | **जि.पुणे** | | |
| ४ | वडीवळे मध्यम प्रकल्प ता.मावळ | ३३०,११ | २१८६,१६ |
| ५ | नाझरे मध्यम प्रकल्प ता.पुरंधर | ११०,९६ | ५५९,२४ |
| | **जि.सातारा** | | |
| ६ | नेर धरणाचे मजबूतीकरण करणे ता.खटाव | ११,९६ | ५८०,३५ |
| क | **लघु प्रकल्प** | | |
| | **जि.कोल्हापूर** | | |
| १ | काडवण ल.पा.तलाव ता.शाहूवाडी | ५०८,९८ | ९०१,०६ |
| २ | मानोली ल.पा.तलाव ता.शाहूवाडी | ६९४,०२ | ८७१,३ |
| ३ | केसरवाडी ल.पा.तलाव ता.शाहूवाडी | ४८२,८७ | ९४२,९६ |
| ४ | पालेश्वर ल.पा.तलाव ता.शाहूवाडी | २१२,४२ | १५५३,४९ |
| ५ | नांदारी ल.पा.तलाव ता.शाहूवाडी | ४०९,४ | ६०७,२५ |
| ६ | एरंडोल पा.तलाव ता.आजरा | ३७३,५४ | ५७२,९३ |

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | मूळ प्रशासकीय मान्यता किंमत रूपये लक्ष | सुधारित प्रशासकीय मान्यतेची किंमत रूपये लक्ष |
|---|---|---|---|
| ७ | ल.पा.तलाव चिवाळे ता. भूदरगड | ११८,०९ | ५८८,०३ |
| | **जि.सांगली** | | |
| ८ | बृहत ल.पा.तलाव भिवर्गी ता.जत | १०८८,९५ | १९७१,३८ |
| ९ | ल.पा.तलाव उमराणी ता. झत | ८५,२८ | १४०,०६ |
| १० | ल.पा.तलाव अर्जुनवाडी (गोमेवाडी) ता. आटपाडी | ४०६,२८ | ५५४,९३ |
| ११ | ल.पा.तलाव तिकोंडी क्र.२ ता. झत | ५९,८७ | १५८,४३ |
| १२ | ल.पा.तलाव बंडगरवाडी ता. कवठे महांकाळ | ६८,८९ | २५४,६३ |
| १३ | ल.पा.तलाव बिळूर(के) ता. झत | १७,९२ | ९८,७६ |
| | **जि.पुणे** | | |
| १४ | को.प.बंधारा उदापूर, ता.जुन्नर | ४३,०८ | ४९,९७ |
| १५ | को.प.बंधारा बेलसर, ता.जुन्नर | ७६,८३ | ९१,०२ |
| १६ | को.प.बंधारा साकोरी ता.जुन्नर | ७१,९५ | १०९,७५ |
| १७ | को.प.बंधारा खोरवडी ता.दौंड | ४०८,८७ | ४७४,७७ |
| १८ | को.प.बंधारा बाबूर्डी (साळोबा डोह) ता.दौंड | ३६,२८ | ४८,२२ |
| १९ | को.प.जेऊर ता.पुरंधर | २८७,८९ | ३७६,२२ |
| २० | ल.पा.तलाव वीरनाला ता.पुरंधर | २४,७८ | ३११,३७ |
| २१ | को.प.बंधारा होळ ता.बारामती | १९४,१६ | २३६,७ |
| २२ | को.प.बंधारा डोंगरगाव ता.मुळशी | ६३,११ | ७२,३७ |
| २३ | ल.पा.तलाव मारणेवाडी ता.मुळशी | ४८,५६ | २०३,५ |
| २४ | ल.पा.तलाव वाळेण ता.मुळशी | ३६६,०९ | ५४७,७ |
| २५ | को.प.बंधारा तांबाड कोळवडे ता.भोर | ४५,२ | ९९,८ |
| २६ | को.प.बंधारा निगडे ता.भोर | ३५,५२ | ७४,९५ |
| २७ | ल.पा.तलाव, थिटेवाडी,ता.शिरूर | १३६,६१ | १०१५,६८ |
| २८ | को.प.बंधारा इनामगाव ता.शिरूर | १४०,१२ | २३९,०८ |
| २९ | को.प.बंधारा काळूस-वाटेकरवाडी ता.खेड | ४८,३४ | ६३,९५ |
| ३० | को.प.बंधारा निरवांगी (निमसाखर) ता.इंदापूर | ४६,९५ | १३१,५७ |
| ३१ | को.प.बंधारा निरवांगी खळाल ता.इंदापूर | ५०,८९ | १५६,५२ |

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | मूळ प्रशासकीय मान्यता किंमत रूपये लक्ष | सुधारित प्रशासकीय मान्यतेची किंमत रूपये लक्ष |
|---|---|---|---|
| ३२ | को.प.बंधारा तांदळी संगम ता.शिरूर | ६१,२३ | ९९,४५ |
| ३३ | को.प.बंधारा जांबूत ता.शिरूर | ९०,९९ | १४२ |
| ३४ | को.प.बंधारा टिकेकरवाडी ता.जुन्नर | १००,६६ | ११६,४४ |
| ३५ | को.प.बंधारा पारगाव आळे ता.जुन्नर | ६५.७२ | ११६,५४ |
| ३६ | ल.पा तलाव हाडशी क्र २ ता.मुळशी | १७२,११ | २३८,७० |
| ३७ | को.प.बंधारा निरा ता.पुरंदर | १६२,३८ | १९४,६० |
| ३८ | को.प.बंधारा नरसिंहपूर ता.इंदापूर | ३२४,६२ | ४९०,६३ |
| ३९ | को.प.बंधारा टण्णू ता.इंदापूर | २८६,३८ | ४४८,५०० |
| ४० | को.प.बंधारा मोरगाव ता.बारामती | ४६,६२ | ६८,६४ |
| ४१ | को.प.बंधारा लाटे ता.बारामती | ९५,८५ | १५०,७९ |
| ४२ | को.प.बंधारा सोनगाव ता.बारामती | ४१,२१ | १२८,२९ |
| ४३ | को.प.बंधारा कोऱ्हाळे ता.बारामती | ८९,५२ | १६५,०० |
| ४४ | को.प.बंधारा गुणवडी (दत्तवाडी) ता.बारामती | ५७,०० | ८१,११ |
| | **जि.सातारा** | | |
| ४५ | को.प.बंधारा भुयाची वाडी,ता.कराड | १२,६२ | १८५,१४ |
| ४६ | ल.पा.तलाव, देवूर,ता.कोरेगाव | ६३,४९ | २०४,६७ |
| ४७ | ल.पा.तलाव, कुमठे,ता.सातारा | ४७,१ | ६७१,९६ |
| | **जि.सोलापूर** | | |
| ४८ | को.प.बंधारा लोटेवाडी वाडी,ता.सांगोला | ८२,९५ | १०५,३९ |
| ४९ | को.प.बंधारा कडलास, ता.सांगोला | १४६,५७ | २३८,८७ |
| ५० | को.प.बंधारा मेथवडे, ता.सांगोला | १०८,८४ | १४८,६६ |
| ५१ | को.प.बंधारा गणेशगाव, ता.माळशिरस | ७६,०३ | १८६,४२ |
| ५२ | ल.पा.तलाव बाभूळगाव ता.बार्शी | ३८३,२३ | ११७३,२२ |
| ५३ | को.प.बंधारा वडापूर (कु), ता.द.सोलापूर | १६४,३८ | ५४२,०४ |
| | **जि.अहमदनगर** | | |
| ५४ | को.प.बंधारा कवडगाव ता.जामखेड | ९०,४७ | ११०,६३ |

मा.मंत्री ([illegible])
व अध्यक्ष मकृखोविम, पुणे

3.1.2000

कार्यकारी संचालक
मकृखोविम, पुणे